कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/आराकप//२०२३-२४/४३४५
दि १३/०२/२०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित आर्टिस्ट विभागातील स्पर्धात्मक स्वरुपाचे राज्य कला प्रदर्शन २४ ते २८ फेब्रुवारी २०२४ दरम्यान संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालयाच्या, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणा-या कलाकारांसाठी निर्धारित नमुन्यातील प्रवेशिका नियमावलीसह आदिलशाह पॅलेस येथील कला अकादमीच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. सदर प्रवेशिका कलाकृतीसह दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १.०० वाजता व दुपारी २.०० ते ४.०० च्या दरम्यान संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालयाच्या, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) स्वीकारण्यात येतील.

उपरोल्लेखित मुदतीनंतर आलेल्या अथवा अपूर्ण स्वरुपातील प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत याची इच्छुक कलाकारांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळविले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)